श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याला आपण परवानगी दिलेली आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्यावर भाष्य सुध्दा केलेले आहे. मला यासंदर्भात मुद्दाम सदनाच्या निदर्शनास आणावयाचे आहे की, त्या गाडीचा अधिकृत पास घेतला गेला आहे. त्या गाडीवर वाहन क्रमांक आहे. त्या गाडीत काय असेल, नसेल त्याची चौकशी आपण करावी. त्या गाडीचा परवाना आहे. गाडी चालविणारे सदनाचे सदस्य आहेत. त्या गाडीमध्ये बसलेले सर्व लोकप्रतिनिधी आहेत. त्या गाडीमध्ये त्यांच्या व्यतिरिक्त कोणी अनधिकृत व्यक्ती असतील तर ते आपण तपासावे. त्या गाडीमध्ये हरकत घेण्याजोगी किंवा ज्यामुळे या सदनाचा अवमान होईल अशी कोणती वस्तू असेल तर ती आपण थांबवावी. परंतु एखाद्या वाहनाला परवानगी दिल्यानंतर आणि त्या गाडीतून आल्यानंतर ते वाहन आणि त्या वाहनामध्ये बसणाऱ्या लोकप्रतिनिधींना अडविले जाते हा या सदनाचा अवमान आहे. आपण परवानगी दिली नसती तर त्यांनी ते वाहन आणले नसते.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या ठिकाणी ....

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय उपमुख्यमंत्री बोलत असताना आम्ही बोललो नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आमचे म्हणणे ऐकून घ्यावे. या सभागृहाची प्रतिष्ठा राखली पाहिजे हे जसे सत्ताधारी पक्षाला कळते तसेच आम्हालाही कळते. आमच्या ज्या समस्या आहेत त्या मांडण्यासाठी विविध आयुधे आहेत. त्या आयुधांचा वापर करुन, लोकशाही तंत्राला अनुसरुन त्यावर काय लिहावे, काय लिहू नये, काय बोलावे, काय बोलू नये याबाबतीत सत्ताधारी पक्षाला जसा अनुभव आहे तसा आम्हालाही अनुभव आहे. आम्ही त्या पध्दतीने वागत असताना अशा पध्दतीने आमच्या सदस्यांना प्रवेश नाकारणे, त्यांना त्या ठिकाणी रोखून ठेवणे हा सर्व सन्माननीय सदस्यांचा आणि पर्यायाने या सदनाचा हक्कभंग होतो. सभापती महोदय, माझी आपल्याला एकच विनंती आहे की, आपण त्यांना आत येऊ द्यावे. आपण वाहन परवाना दिलेला आहे. ते वाहन आणत असताना जी काही तपासणी करावयाची असेल ती करावी. त्यानंतर हरकत घ्यावयाची असेल तर आणि विधान भवनाच्या आवारामध्ये ते वाहन येऊ नये असे आपल्याला वाटत असेल तर नंतर आपण ती गाडी बाहेर काढू शकता. परंतु आपण त्यांना परवाना दिलेला आहे त्यामुळे त्यांना आत येऊ दिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. मधुकर सरपोतदार ...

पाहिजे. हे सदन चालू असताना लोकप्रतिनिधींना प्रवेशव्दारावर रोखणे हा या सदनाचा अवमान आहे. यादृष्टीने आपण या प्रश्नाकडे बघून याबाबत निर्णय द्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या सदनाचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी हरकतीच्या मुद्याव्दारे हा विषय आपल्या निदर्शनास आणून दिला आणि आपण त्यावर निर्णय दिलेला आहे. खरे तर सभागृहासमोर कोणतेही कामकाज सुरु नसताना हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही. आपण सांगितले की, खास बाब म्हणून त्यांना परवानगी दिलेली आहे. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आपल्यासमोर अशी परिस्थिती कथन करीत आहेत की, या सभागृहाच्या सदस्यांना आपल्या सिक्युरिटीच्या लोकांनी गेटवर थांबविले आहे. त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी, सुरक्षिततेच्या दृष्टीने काय उपाययोजना करावी यासंबंधी आपले लेखी निवेदन आपण देत असता. तशा पध्दतीने सुरक्षा व्यवस्थेच्या लोकांना सूचना दिलेल्या आहेत. सुरक्षा व्यवस्थेचे लोक कोणालाही थांबविण्याचे काम करीत नाही, असा आपला अनुभव आहे. अशा परिस्थितीमध्ये सदस्यांना गेटवर थांबविले आहे अशी माहिती सन्माननीय सदस्य देत आहेत आणि ते सन्माननीय सदस्य जोपर्यंत सभागृहात येत नाहीत तोपर्यंत सभागृहाचे कामकाज थांबवावे अशी मागणी केली जात आहे. माझी याला एवढ्याकरिताच हरकत आहे की, अशा पध्दतीची जी माहिती दिलेली आहे ती आपल्याला तपासून घेता येईल. कारण सर्रास कोणाला असे थांबविले जात नाही. त्यांना थांबविण्याचे कारण काय आहे, सुरक्षा व्यवस्थेच्या लोकांनी असे धाडस का केले, त्याच्या पाठीमागे कोणी असेल, काही आक्षेपार्ह गोष्टी आढळून आल्या असतील म्हणून त्यांना थांबविले काय ? याबाबत नंतर चौकशी करुन खात्री करता येईल आणि सभागृहात निवेदन करता येईल. परंतु एखाद्या सदस्याला बाहेर थांबविले या माहितीच्या आधारे सभागृहाचे कामकाज थाबविणे ही बाब नियमामध्ये बसणारी नाही. त्यामुळे आपण सदनाचे कामकाज सुरु करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री. मधुकर सरपोतदार : या सदनातील पाचसहा सदस्य त्या वाहनामध्ये आहेत. सदस्यांना असा कोणताही युक्तिवाद करता येणार नाही. त्या युक्तिवादाला काही तरी आधार पाहिजे असतो. मी आधारावर बोललो. आपण पास दिला नसता तर आमची तक्रार नव्हती.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(दोन्ही बाजूकडील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आपण सुरक्षा विभागाकडून यासंदर्भात माहिती घ्यावी.

श्री. मधुकर चव्हाण : तोपर्यन्त सभागृहाचे कामकाज तहकूब करावे..

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, गाडीमध्ये काही आक्षेपार्ह असेल तर त्याबाबत आपण सुरक्षा विभागाकडून माहिती घ्यावी, तोपर्यन्त सभागृहाचे कामकाज चालू ठेवावे. सभागृहाला कशाला वेठीस धरता ?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपल्या सुरक्षा विभागाने गाडी अडविली आहे. माननीय सदस्य ज्या गाडीतून विधान भवनाच्या इमारतीमध्ये प्रवेश करतात त्या गाडीला पास दिलेला आहे. असे असताना सुध्दा सन्माननीय सदस्यांची गाडी अडविण्यात आलेली आहे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड, सन्माननीय सदस्य भास्कर जाधव यांनी हरकतीच्या मुद्याद्वारे ज्या भावना व्यक्त केल्या त्यासंदर्भात माझे मत असे आहे की, कोणत्याही सन्माननीय सदस्यांना कोणीही अडवू शकत नाही, अडवित नाही आणि अडविणार नाही यासंबंधीची काळजी पूर्णतया घेतली जाते. सन्माननीय सदस्य या ठिकाणी येत असताना जर एखादी गाडी किंवा अन्यबाबतीत सुरक्षा विभागाचा काही आक्षेप असेल तर त्याबाबतीत त्यांनी सन्माननीय सदस्यांना न अडविता ते आत कसे येतील हे आपण जरुर पाहू. परंतु सन्माननीय सदस्य ज्या वाहनातून येतात त्याबाबतीत सुरक्षा विभागाचा काही आक्षेप असेल तर मला वाटते कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने त्याचाही विचार करणे जरुरीचे आहे. जे सन्माननीय सदस्य विधान भवन इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ आहेत त्यांनी तेथून तातडीने सभागृहामध्ये यावे अशी माझी आपणा मार्फत त्यांना विनंती आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या गाडीला पास दिलेले असताना देखील त्यांची गाडी अडविलेली आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : प्रवेशद्वाराजवळ अन्य सन्माननीय सदस्यांच्या गाड्या उभ्या असल्यामुळे दोन्ही सभागृहाच्या जवळपास 200 सन्माननीय सदस्यांना सभागृहामध्ये येता येत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. जितेंद्र आव्हाड : विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जर एवढ्या जबाबदारीने वागत असतील तर अन्य सन्माननीय सदस्यांना प्रवेशद्वाराजवळ कशाला अडविता ? गाडी आक्षेपार्ह आहे..

श्री. मधुकर चव्हाण : गाडीमध्ये काय आक्षेपार्ह आहे ?

सभापती : सन्माननीय सदस्यांना कोणीही अडवू शकणार नाही, अडविण्याचे कारण नाही. किंबहुना या सदनाच्या माध्यमातून मी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करीन की त्यांनी, "प्रवेशद्वाराजवळ असलेल्या सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये यावे" असा, माझा निरोप त्यांना सांगावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी तेथे स्वत: पाहून आलो आहे. त्या गाडीवर आक्षेपार्ह असे काहीही लिहिलेले नाही. "शेतक-यांना कर्जमुक्ती द्या" एवढेच लिहिलेले आहे. हे लिहिलेले शासनाच्या दृष्टीने जर आक्षेपार्ह असेल तर "शेतकरी हा कर्जमुक्त झालाच पाहिजे" असेच आमचे म्हणणे आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतकरी कर्जमुक्त झालाच पाहिजे.

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

सभापती : मी सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी १२.१५ वाजता ००.१५ मिनिटांसाठी तहकूब झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभापती : सभागृहाची बैठक 30 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 12:30 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभापती : सभागृहाचे कामकाज सुरू करण्यापूर्वी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी या ठिकाणी एक महत्वाचा मुद्दा उपस्थित केला. त्या संदर्भात मी सत्तारूढ आणि विरोधी पक्षाबरोबर चर्चा केली. आपण सर्वजण प्रथा, संकेत सातत्याने पाळत आलो आहोत. यापुढील काळात सुध्दा पाळावयाचे ठरविले आहे. एक अपवाद म्हणून आज सन्माननीय सदस्यांची गाडी विधान भवनात आणण्यास परवानगी दिलेली आहे आणि सन्माननीय सदस्य सभागृहात देखील उपस्थित झालेले आहेत. त्यामुळे तो विषय संपलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी : नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाबाबत

सभापती : याठिकाणी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याचा प्रस्ताव देण्यात आलेला आहे. एका महत्वाच्या बाबीवर चर्चा घडवून आणण्याकरिता सदनाचे कामकाज स्थगित करावे असा त्या प्रस्तावाचा मूळ गाभा आहे. प्रश्नोत्तराचा तास सुरु झाल्यानंतर दोन वेळा सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागले. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास होऊ शकला नाही.

"राज्यात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या" या विषयाचे महत्व व गांभीर्य विचारात घेऊन नियम 289 अन्वये सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री.पाशा पटेल, प्रकाश शेंडगे, गोपीकिसन बाजोरिया, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब व श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी प्रस्ताव दिलेला आहे. त्या प्रस्तावाचा थोडक्यात आशय पुढील प्रमाणे आहे:-

"विदर्भातील जवळपास 1500च्या वर शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, राज्य सरकारच्या अखत्यारित असणाऱ्या जिल्हा सहकारी बँका, सेवा सहकारी सोसायट्या आणि भूविकास बँका यांनी शेतकऱ्यांकडून मूळ कर्जाच्या 5 ते 10 पट वसुली करणे, तसेच वेळोवेळी मंत्र्यांनी शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्याबाबत घोषणा करूनही त्याची अंमलबजावणी न होणे, उद्योग क्षेत्रातील एक रकमी कर्जफेड योजना शेतकऱ्यांना लागू करणे आवश्यक असणे. तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांना पूर्णपणे कर्जमुक्त करणे."

या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, हा महत्वाचा प्रस्ताव आहे. तो शेतकऱ्यांशी संबंधित आहे. शेतकऱ्यांच्या अनुषंगिक जी परिस्थिती आहे त्याबाबत आपण याठिकाणी अनेकवेळा चर्चा केलेली आहे. त्या चर्चेमध्ये दोन्ही बाजूच्या सदस्यांनी मोठ्या हिरिरीने भाग घेतलेला आहे. आता जो प्रस्ताव दिलेला आहे त्यावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि दोन-तीन सन्माननीय सदस्यांना एक-दोन मिनिटांमध्ये त्यांचे विचार मांडण्यास मी परवानगी देत आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दुर्दैवाने गेली 2-3 वर्षे नागपूर अधिवेशनामध्ये आम्हाला पहिल्याच दिवशी अशाप्रकारचा शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधीचा प्रस्ताव याठिकाणी आणावा लागत आहे. या विषयी आम्ही सभागृहामध्ये दोन-तीनदा चर्चा घडविली आहे. मागच्या अधिवेशनाच्या आधी देशाचे माननीय पंतप्रधान तसेच आपल्या राज्याचे मुख्यमंत्री या दोघांनीही आत्महत्येवर उपाय म्हणून माननीय पंतप्रधानांनी 3700 कोटी रुपयांचे पॅकेज आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी 1 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. ज्या शेतकऱ्यांच्या घरी आत्महत्या झालेली आहे त्या शेतकऱ्यांच्या घरी एक लाख रुपयांची मदत शासनाच्या वतीने देण्याच्या दृष्टीनेही घोषणा झाली. पॅकेज माध्यमातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या पाहिजेत असे देश पातळीवर माननीय पंतप्रधानांनी सांगितले. हे सर्व चालू असतानाच या राज्य सरकारच्या माध्यमातून पॅकेजचे तीन तेरा वाजले. गेल्या वर्षभरामध्ये म्हणजे दिनांक 1 जानेवारी, 2007 पासून ते नोव्हेंबर,2007 पर्यंत राज्यात जवळपास 1500 च्या वर शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. राज्य सरकारने 6 टक्के व्याजाने कर्ज देण्याची घोषणाही केली होती. परंतु 6 टक्के दराने शेतकऱ्यांना कर्ज मिळालेले नाही. राज्य सरकारने पॅकेज दिले, शेतकऱ्यांचे व्याज माफ केले परंतु त्यांच्या कर्जाचे पुनर्गठन झाले. शेतक-यांच्या पहिल्या 25 हजारांवरील व्याज माफीमध्ये आपण त्यांना पुन्हा 25 हजार रुपयांचे कर्ज दिले, अशाप्रकारे पहिले 25 हजार रुपये व नंतरचे 25 हजार रुपये अशाप्रकारे एकूण 50 हजार रुपयांचे कर्ज त्यांच्यावर आले. रिझर्व्ह बँकेच्या धोरणाप्रमाणे कर्जाची परतफेड योजनासुध्दा लाभ आपण जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून त्या शेतक-यांना दिलेला नाही. पॅकेजच्या माध्यमातून शेतक-यांना ज्या वस्तू वाटल्या गेल्या, त्याही अतिशय निकृष्ट दर्जाच्या होत्या व त्यामध्येही लाखो रुपयांचा मलिदा खाण्यात आला.

सभापती : मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना मध्येच थांबवत आहे. आपण प्रथम नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय करुन घेऊया.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय

श्री.दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) व वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण विभाग) सभापती महोदय, औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातर्फे निर्वाचित केलेल्या श्री.किशनचंद लेखराज तनवाणी यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाबाबत

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पुन्हा आत्महत्येचे सत्र जोरात सुरु झाले. अधिवेशनाचा हा पहिला आठवडा आहे. सभापती महोदय, मी काल बुलढाणा जिल्हयात गेलो होतो. बुलढाणा जिल्हयातील सातभूसारी गावातील शेतकऱ्याने डोक्यावर कर्ज असल्यामुळे पत्र लिहून कालच आत्महत्या केली. आज शेतकरी मोठयाप्रमाणात आत्महत्या करीत आहेत, हे सरकारही कबूल करीत आहे, परंतु त्याप्रमाणे शेतकऱ्यांना....

सभापती : प्रस्तावावर आपण नंतर सविस्तर बोलू.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजच्याच लोकसत्ता या वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले आहे की," मदतीसाठी अपात्र ठरलेली 2 हजार शेतकरी कुटुंबे उघडयावर..." म्हणजे आत्महत्या होऊनही शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाही. सभापती महोदय, हा अतिशय गंभीर मुद्दा आहे. या सर्व आत्महत्यांना आळा घालण्याच्या दृष्टीने एकमेव उपाय म्हणजे शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले पाहिजे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर कर्जमुक्ती करणे हाच जालीम उपाय आहे. म्हणून या सदनाच्या माध्यमातून या गंभीर परिस्थितीचा विचार करुन राज्यातील कर्जबाजारी ठरलेल्या शेतकऱ्यांना कर्जातून मूक्त करावे, अशाप्रकारचा प्रस्ताव याठिकाणी आम्ही दिलेला असून तो आपण मान्य करावा व आजच या सभागृहात याविषयी चर्चा करावी, अशी आमची मागणी आहे.

नंतर श्री.रोझेकर.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी केवळ नियम 289 चे महत्व सभागृहाला सांगण्याकरिता उभा आहे.

सभापती महोदय, सर्व नियम स्थगित करुन तातडीने या विषयावर सभागृहात चर्चा घेण्याचे कारण असे आहे की, वर्षभरात 1500 पेक्षा जास्त शेतक-यांनी आत्महत्या केली आहे. गेल्या आठ दिवसात 37 शेतक-यांनी आत्महत्या केली आहे आणि या आत्महत्यांना सरकार जबाबदार आहे म्हणून आम्ही विरोधी पक्षाने नियम 289 चा आधार घेतलेला आहे.

सभापती महोदय, भूविकास बँक, राज्य सहकारी बँक, जिल्हा सहकारी बँक आणि सेवा सहकारी सोसायटया यांचे जे काम चालते त्याची जबाबदारी राज्य सरकारवर आहे. पर्यायाने राज्य सरकारला म्हणजेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना हे अधिकार आहेत की, ते या बँकांचे संचालक मंडळ बरखास्त करु शकतात. म्हणजेच या बँकांचे ख-या अर्थाने मालक राज्य सरकार आहे, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आहेत. या बँका शेतक-यांकडून दामदुपटीने कर्ज वसूल करतात म्हणून शेतकरी आत्महत्या करतात, याची असंख्य उदाहरणे माझ्याकडे आहेत व यासंबंधीचे पुरावे मी माझ या भाषणाच्या वेळी सभागृहाच्या निदर्शनास आणून देणार आहे. 60 हजार रुपयांच्या मूळ कर्जाची 12 लाख रुपये वसूली झाली आहे. शायलॉकलाही लाजवेल अशाप्रकारचे कृत्य या लोकांनी केले आहे. एवढा लाजीरवाणा प्रकार केला आहे आणि या सर्व प्रकाराला राज्य सरकार जबाबदार आहे. रिझर्व बँकेने आणि आपणही मागे ज्यावेळी या विषयावर चर्चा झाली त्यावेळी सांगितले आहे की, प्रिन्सिपल अमाऊंट 10 हजार असेल आणि त्यावरील व्याज 8 हजार होत असेल तर एकूण 18 हजार रुपये शेतक-यांकडून वसूल केले जातात. मी आपल्याला 50 उदाहरणे याच ठिकाणी देण्यास तयार आहे की, ज्यांचे व्याज पूर्ण माफ करण्यात आले आहे आणि भांडवलातील केवळ 35 टक्के, 22 टक्के रक्कम वसूल करण्यात आली आहे. म्हणजे 10 हजार रुपयांचे कर्ज 2200 रुपयांवर सेटल केल्याची असंख्य उदाहरणे माझ्याकडे आहेत. जर उद्योगपतींना आणि व्यापा-यांना अशाप्रकारे कर्जमुक्त केले जात असेल तर शेतक-यांना का केले जात नाही ? हा खरा प्रश्न आहे आणि यामुळेच शेतकरी आत्महत्या करीत आहेत, एवढेच नव्हे तर या सर्व आत्महत्यांसाठी सरकार जबाबदार आहे. गेल्या आठवडयात 37 शेतक-यांनी आत्महत्या केल्या आणि या एका वर्षात 1500 शेतक-यांनी आमहत्या केल्या. देशाच्या पंतप्रधानांनी आणि

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी पॅकेज जाहीर केल्यानंतर आत्महत्यांमध्ये तीन पटींनी वाढ झाली. राज्याचे उर्जामंत्री, श्री.दिलीप वळसे-पाटील यांना कुठुन सूचले माहित नाही, दुष्काळात तेरावा महिना आल्यासारखे त्यांनी विदर्भात 18 तास लोडशेडिंग सुरु केले. शेतक-यांना आधार देण्याऐवजी अशाप्रकारे त्यांना आणखी अडचणीत आणल्यामुळेही शेतकरी आत्महत्या करीत आहेत. एखाद्या गोष्टीसाठी सरकार डायरेक्टली वा इनडायरेक्टली जबाबदार असेल तर सभागृहात या प्रस्तावान्वये हे सिद्ध करावे लागते की, सरकार कशा पद्धतीने जबाबदार आहे. राष्ट्रीयीकृत बँकांचे कर्ज आहे त्याला केंद्र सरकार जबाबदार आहे, हे मान्य आहे. पण राज्यातील बँकांनी कर्ज दिलेल्या प्रकरणांमध्ये राज्य सरकार जबाबदार आहे. त्यामुळे हा केंद्र शासनाचा प्रश्न आहे, असे म्हणून या बोटावरची थुंकी त्या बोटावर फिरविण्याचा प्रकार या ठिकाणी चालणार नाही. शेतक-यांच्या आत्महत्यांना राज्य सरकार जबाबदार आहे, तातडीचा विषय आहे, 37 शेतक-यांनी गेल्या आठवडयात तर 7 शेतक-यांनी गेल्या दोन दिवसात आत्महत्या केलेली आहे. यापेक्षा आणखी तातडीचा विषय कोणता असू शकतो ?

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी व इतर सन्माननीय सदस्यांनी इतर सर्व नियम स्थगित करुन नियम 289 अन्वये या तातडीच्या विषयावर चर्चा घ्यावी, असा प्रस्ताव दिलेला आहे. महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 मी या ठिकाणी वाचून दाखवितो. तो असा आहे की, "कोणत्याही सदस्यास सभापतींच्या संमतीने कोणताही नियम विधानपरिषदेपुढील कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करतांना स्थगित करण्यात यावा असा प्रस्ताव मांडता येईल आणि प्रस्ताव संमत झाला तर, संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल" 37 शेतक-यांनी अधिवेशन सुरु होण्यापूर्वी आत्महत्या केल्या, 1500 शेतक-यांनी गेल्या वर्षभरात आत्महत्या केल्या, यापेक्षा दुसरी तातडी काय असू शकेल ? म्हणून शेतकरी मृत्युमुखी पडत असतांना इतर विषयावर चर्चा करणे बरोबर होणार नाही. यासाठीच सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी व इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये नियम स्थगित करण्याची विनंती केली आहे, त्याप्रमाणे नियम स्थगित करुन चर्चा सुरु करावी, अशी माझी विनंती आहे. सत्तारुढ पक्षाच्या नेत्यांनाही विनंती आहे की, या गंभीर आणि तातडीच्या प्रश्नावर आपण देखील चिंता व्यक्त करीत आहात. म्हणून या विषयावर चर्चा

..3.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

घडवून आणण्याबाबत सहकार्य करावे आणि चर्चा सुरु करण्याकरीता सहमती द्यावी. माननीय सभापती महोदयांनी निर्णय करावा, इतर सर्व कामकाज थांबवून चर्चा घडवून आणावी, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, आज अधिवेशनाला सुरुवात झाल्यापासून विदर्भ आणि मराठवाडयातील शेतक-यांच्या आत्महत्यांचा विषय या सदनामध्ये उपस्थित झाला आहे. मला माहीत नाही की, शासकीय पक्ष, सत्तारुढ पक्ष कोणत्या खुशीत गाजर खातो आहे. एवढी मोठी जवलंत समस्या महाराष्ट्रापुढे उभी असतांना अन्य सर्व निर्णय होतात आणि शेतक-यांच्या आत्महत्या मात्र हे शासन अतिशय सुस्तपणे पाहत आहे. कोणी कोणताही इलाज करण्यास तयार नाही. मला असे वाटते की, विधानपरिषद नियम 289 अन्वये शेतक-यांच्या प्रश्नावर स्थगन प्रस्ताव देण्याची ही दुसरी किंवा तिसरी वेळ आहे. सभागृहाचे अन्य कामकाज स्थगित करुन या प्रश्नावर चर्चा करावी. परंतु या प्रश्नावर सभागृहामध्ये चर्चा घडून येत नाही. सभापती महोदय, शेतक-यांच्या प्रश्नावर सभागृहामध्ये चर्चा करण्यास आपण परवानगी द्यावी. केवळ चर्चा करुन हा प्रश्न मार्गी लागेल काय, हा खरा प्रश्न आहे. शेतक-यांच्या आत्महत्यांवर चर्चा करुन निर्णय घेण्याची ही वेळ आहे. ज्यावेळी प्रसंग येतो त्यावेळी निर्णय घ्यावयाचा असतो. परंतु केंद्र सरकारकडे बोट दाखविले जाते की, हा निर्णय केंद्र सरकारने घ्यावयाचा आहे. केंद्रामध्ये सत्ताधारी पक्षाची सत्ता आहे. इतक्या वर्षात या प्रश्नावर केंद्र शासनाबरोबर चर्चा करुन निर्णय घेण्याची सवड राज्य शासनाला मिळाली नाही. राज्य शासन कामकाजामध्ये इतके व्यस्त आहे काय ? मी नियमांच्या तरतुदीमध्ये न जाता फक्त विषय मांडतो. आम्ही आज जी मागणी केलेली आहे ती केवळ चर्चा करण्यापुरती नाही. या विषयावर चर्चा करुन निर्णय व्हावयास पाहिजे, अशी आमची मागणी आहे. शेतक-यांच्या आत्महत्यांचा विषय आता ऐरणीवर आलेला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात शेतक-यांच्या आत्महत्या हा चर्चेचा विषय आहे. शासन मात्र बहिरे गुंग होऊन बसले आहे. प्रतिक्रिया देतांना कोणी केंद्र शासनाकडे बोट दाखविते तर कोणी बँकांकडे बोट दाखविते. कोणी असे सांगते की, शेतकरी व्यसनाधीन आहेत, शेतकरी जुगारामध्ये पैसे घालवितात त्यामुळे ते आत्महत्या करतात. शेतक-यांच्या आत्महत्यांची अनेक कारणे दिली जातात. हा कारणे देण्याचा प्रसंग नाही. सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, या प्रश्नावर सभागृहामध्ये चर्चा घडवून आणावी. शेतक-यांचे कर्ज माफ करण्याचा प्रस्ताव दोन्ही सभागृहात मंजूर करुन महाराष्ट्र शासन शेतक-यांचे कर्ज माफ करण्याची शिफारस केंद्र

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .....

शासनाकडे करीत आहे, असा प्रस्ताव मांडून तो केंद्र शासनाकडे पाठवावा आणि वेळ पडली तर सभागृहाचे कामकाज तहकूब करुन मंत्रिमंडळाची विशेष बैठक बोलवावी. केंद्र शासन हा प्रस्ताव नाकारु शकत नाही. सध्या 'बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी' अशी परिस्थिती आहे. आश्वासने द्यायची मात्र प्रत्यक्षात कृती काहीच नाही, अशी परिस्थिती आहे. दोन दिवसात 7 शेतक-यांनी आत्महत्या केल्या. शेतक-यांच्या आत्महत्यांचा सिलसिला सुरुच आहे. "रोज मरे त्याला कोण रडे" अशी मराठीमध्ये म्हण आहे. त्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. परंतु शासनाला त्याचे काही वाटत नाही. महाराष्ट्र राज्य प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र राज्य उद्योग क्षेत्रामध्ये एक नंबरवर आहे, असे जाहीरपणे सांगितले जाते. परंतु महाराष्ट्र राज्य शेतक-यांच्या आत्महत्यांमध्ये एक नंबरवर आहे, हे सांगण्यास ते विसरतात. सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण शासनाला निदेश द्यावेत आणि या प्रस्तावावर सभागृहामध्ये चर्चा घडवून आणावी. शेतक-यांना कर्ज मुक्त करण्याचा प्रस्ताव दोन्ही सभागृहात मांडून शेतक-यांचे कर्ज माफ करण्याचा सकारात्मक निर्णय राज्य शासनाने घ्यावा. सभापती महोदय, आम्ही विधानपरिषद नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे तो आपण स्वीकारावा व शासनाने शेतक-यांच्या कर्ज माफीचा निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

यानंतर कु.जयश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानपरिषद नियम 289 अन्वये माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि इतर सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे, त्यावर मला बोलण्याची जी संधी आपण दिली त्याबद्दल मी धन्यवाद देतो. सदर प्रस्तावाच्या संदर्भात आम्हाला चर्चा करण्याची संधी देऊन आपण शेतक-यांच्या बाजूने कौल दिला, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. नियम 289 मध्ये असे म्हटलेले आहे की,

"कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या संमतीने कोणताही नियम विधानपरिषदेपुढील कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करतांना स्थगित करण्यात यावा, असा प्रस्ताव मांडण्यात येईल आणि प्रस्ताव संमत झाला तर संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल."

आज या ठिकाणी आपल्या अनुमतीने आम्ही सदर विषयावर चर्चा करण्यात यावी, असा प्रस्ताव मांडण्यासाठी उभे आहोत. प्रस्ताव संमत झाला तर संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित करण्यात येईल. हा प्रस्ताव मान्य झाल्यानंतर प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी आम्ही आमच्या अपेक्षा, भावना, मत व्यक्त करु.

संत तुकडोजी महाराजांच्या पुण्यभूमीमधून मी दिंडी काढून येथे पोहोचलो, तो विषय मी माझ या भाषणामध्ये निश्चितपणे मांडीन. यासंदर्भातील समाजाच्या संवेदना मांडीन. समाजाच्या संवेदनांच्या बाबतीत या सभागृहामध्ये आता एक आव्हान उभे राहिलेले आहे. शेतक-यांच्या वाढत चाललेल्या आत्महत्येच्या संदर्भात आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे, त्या प्रस्तावावर चर्चा करण्याकरिता माननीय सभापती महोदयांनी मान्यता दिलेली आहे, परंतु सभागृहाने एकमताने तो संमत करावयाचा आहे. माननीय शरदचंद्रजी पवार साहेबही म्हणाले की, कर्जमुक्ती होणे आवश्यक आहे. त्यामुळे राष्ट्रवादी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांवरही आता बंधन आलेले आहे, म्हणून सर्वांनी या प्रस्तावाला मान्यता देऊन आपले भाष्य शेतक-यांच्या बाजून करावे. चार दिवसांपूर्वी माननीय शरदचंद्रजी पवार साहेब असेही म्हणाले होते की, सिंचनाचा अनुशेष राहिल्यामुळे शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत, त्यामुळे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना या प्रस्तावामध्ये त्याच प्रखरतेने उडी टाकून बोलता येईल, अशी माझी भावना आहे. या राज्याचे माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले की, शेतक-यांना कर्जमुक्ती देण्यास आमची तयारी आहे, परंतु केंद्राकडून हिरवा, लाल, काळा अशा कोणत्या तरी रंगाच्या कंदिलाची ते मागणी करीत आहेत, शेतक-यांना कर्जमुक्ती देण्याची मानसिकता त्यांचीही आहे. राष्ट्रीय काँग्रेसच्या सर्व

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सन्माननीय सदस्यांना देखील सदर चर्चेच्या दरम्यान शेतक-यांच्या बाजूने भाषण करणे आता शक्य झालेले आहे. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या शहरामध्ये बाहेर फिरतांना दिसते की, जागोजागी या सर्व मंडळींचे स्वागत करण्यासाठी मोठमोठे होर्डिंग्ज लावण्यात आलेले आहेत परंतु त्यावर काहीही लिहिलेले आपल्याला आढळून येणार नाही. शेतक-यांना असे वाटते की, हे मोठमोठे नेते आपल्या अडचणी सोडविण्यासाठी आले आहेत की काय, तर त्या होर्डिंग्जवर काही का लिहिण्यात आलेले नाही? हे कोडे सोडविण्याची जबाबदारी आता तुमच्यावर आलेली आहे. तरी चर्चेच्यासंदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांची संमती मिळावी, चर्चेला जास्त वेळ मिळावा, अशी मी विनंती करतो. मी परवा एक गाडी घेऊन आलो होतो, परंतु माझी गाडी अडविण्यात आली, त्याबद्दल मी धन्यवाद देतो. परंतु उद्या मी येथे येतांना बैलगाडी देखील घेऊन येऊ शकतो. कारण वाहन कोणते वापरावे, तो माझा प्रश्न आहे. सभापती महोदय, आज बाहेर माझा एक ट्रक उभा आहे. आजचा शेतकरी हा कर्जामध्ये अडकलेला आहे आपण शेतक-याचे कैवारी आहात, आपण ज्यावेळी मंत्री होता त्यावेळी आपल्या भाषणामधून शेतक-यांना कर्जमुक्ती देण्यासंदर्भात मत व्यक्त केले होते. आज शेतक-याला कर्जातून मुक्ती देणे आवश्यक आहे आणि त्याला कर्जमुक्ती द्यावयाची असेल तर कर्जमाफी हा पहिला इलाज आहे. यापूर्वी केलेले अनेक इलाज अपयशी ठरलेले आहेत. पॅकेजअंतर्गत झालेल्या भ्रष्टाचाराच्या संदर्भातील सर्व अवजारे मी आणलेल्या ट्रकमध्ये उभी केलेली आहेत, आपण सदर ट्रकला आतमध्ये येण्याची परवानगी दिली तर राज्यातील शेतकरी इतक्या मोठया प्रमाणावर आत्महत्या का करीत आहेत ते मला येथे सविस्तरपणे सांगता येईल. तरी या प्रस्तावाला ताबडतोब मान्यता देण्यात यावी, अशी मी विनंती करतो. आज सर्व ठिकाणाहून शेतक-यांना कर्जातून मुक्ती मिळावी, अशी भावना आहे. यासंदर्भामध्ये तातडीने या चर्चेला उत्तर देतांना निर्णय घ्यावा, अशा प्रकारची आमची भूमिका आहे. या सदनामध्ये या विषयावर चर्चा होण्याकरिता वेळ न घालविता मंजूरी द्यावी. समोर बसलेल्या सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावाला मान्यता देऊन शेतक-यांच्या बाजूने आपले मत मांडावे, त्यांनी शेतक-यांच्या बाबतीत टाहो फोडावा असे मी म्हणणार नाही परंतु त्यांनी शेतक-यांच्या बाजूने मत मांडावे, अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील, सदर विषयावर विधानपरिषद नियम 289 अन्वये आजच चर्चा व्हावी, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. यासंदर्भात शासनाने आपले मत व्यक्त करावे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभागृहाचे नेते किंवा उपनेते आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. सभागृहाचे कामकाज 10 मिनिटे तहकूब करुन सभागृहाचे नेते किंवा उपनेते यांना यासंदर्भात चर्चा करण्याकरिता बोलावून घेण्यात यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सदर प्रस्तावावर आम्हालाही बोलावयाचे असल्याकारणाने सभागृहाचे नेते किंवा उपनेते येईपर्यंत आमची काही भाषणे होतील. तसेच, शेतक-यांनाही दिलासा मिळेल की, शेतक-यांचीच लेकरे या सदनामध्ये आमदार व मंत्री होऊन बसलेले आहेत.

यानंतर श्री.गागरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : मला असे वाटते की, संसदीय कार्यमंत्री महोदयांनी शालेय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके यांना सभागृहाच्या नेत्यांना बोलावण्यासाठी पाठविले आहे. तरीही विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन सभागृहाचे नेते येईपर्यत 10 ते 15 मिनिटे कामकाज स्थगित करावे, अशी मी विनंती करतो.

सभापती : सभागृहाची बैठक मी 15 मिनिटासाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 26 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

सभापतीस्थानी : माननीय सभापती

सभापती : या ठिकाणी नियम 289 अन्वये प्रस्ताव देण्यात आलेला आहे. हा प्रस्ताव तातडीने घेण्याच्या दृष्टीने कसा महत्वाचा आहे या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार व सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी याठिकाणी त्यांची मते मांडली आहेत. श्री. दिलीप वळसे पाटील यांनी देखील ही चर्चा घेण्यास हरकत नाही असे सांगितले. परंतु त्यांचे असे मत आहे की, सभागृहाचे नेते, उपनेते यांच्याशी चर्चा करुन याबाबतीत अंतिम निर्णय घेण्यात यावा.

या प्रस्तावाच्या संदर्भात माझी भूमिका देखील अनुकूल आहे. हा प्रश्न शेतकऱ्यांच्या जीवनमरणाचा व अत्यंत महत्वाचा आहे. दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य हे देखील शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. म्हणून ही चर्चा घेण्याचा निर्णय मी आता घेत आहे. त्या अगोदर मी संसदीय कामकाज मंत्र्यांना ही चर्चा कधी घ्यावी, आज घ्यावी किंवा कधी .....

(गोंधळ)

काही सन्माननीय सदस्य : आम्हाला आजच चर्चा हवी आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या विषयासंदर्भात चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. परंतु मघाशी सभापतींच्या दालनामध्ये याबाबत चर्चा झालेली आहे. त्यामुळे ही चर्चा आपण उद्या घ्यावी.

(गोंधळ)

श्री. नितीन गडकरी : माननीय सभापती महोदय, नियम 289 अन्वये, एखादा विषय तातडीचा असेल तर त्याबाबत नियम स्थगित करण्याची तरतूद आहे. गेल्या सात दिवसामध्ये 37 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली आहे. आपण यासंबंधी जर आज निर्णय घेतला नाही तर पुढील आठवडयात आणखी 100 शेतकरी आत्महत्या करतील. त्यास कोण जबाबदार राहणार आहे ? हा विषय महत्वाचा आहे म्हणून याबाबत नियम 289 लागू करावा. या प्रस्तावावर आजच चर्चा होणे महत्वाचे आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज या सभागृहामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या विषयापेक्षा इतर कोणताही विषय महत्वाचा नाही. म्हणून ही बाब तातडीची आहे. केंद्र शासनाने शेतकऱ्यांकरिता पॅकेज जाहीर केल्यानंतर देखील 1800 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. तसेच या आठवडयामध्ये 35 शेतकऱ्यांनी आत्म्हत्या केली. अधिवेशन सुरु झाल्यानंतर 3 शेतकऱ्यांनी विदर्भामध्ये आत्महत्या केली. म्हणून या विषयावरील चर्चा आजच झाली पाहिजे. इतर कोठल्याही परिस्थितीमध्ये ही चर्चा पुढे ढकलता कामा नये. तसेच आमची अशी आग्रहाची मागणी आहे की, या चर्चेच्या दरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व या सदनाचे नेते श्री. आर. आर. पाटील यांनी देखील याठिकाणी उपस्थित असावे.

यानंतर श्री. सुंबरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही खरे म्हणजे संसदीय आयुध घेऊन ही चर्चा मागितली आहे. वस्तुत: शेतकऱ्यांना कर्जमुक्ती दिल्याशिवाय हे अधिवेशन चालवूच नका अशी आमची मागणी होती. सरकारने शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती जाहीर करावी अशीच आमची स्पष्ट मागणी होती आणि आहे. पण तरीही संसदीय मार्गाचा अवलंब करून आम्ही आता ही चर्चा येथे मागत आहोत. पण त्या चर्चेला देखील सरकार नकार देत आहे. तेव्हा आजच्या आज ही चर्चा घेतलीच पाहिजे ही आमची स्पष्ट मागणी आहे, सभापती महोदय, आपलेही तसेच मत आहे. पण त्यालाही सरकार नकार देत आहे मग कशाच्या आधारे शेतकऱ्यांनी या सरकारवर विश्वास ठेवायचा? तेव्हा आता सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे आजच्या आजच या विषयावर चर्चा या ठिकाणी आपण घ्यावी अशी आग्रहाची आपल्याला विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आम्ही चर्चा नाकारलेली नाही. या विषयी चर्चा करण्याची सत्तारूढ पक्षाची तयारी आहे मात्र ही चर्चा उद्या घेण्यात यावी इतकीच आमची आपल्याला विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मग आम्ही नियम २८९ खाली ही चर्चा मागितली कशासाठी ? ...

(विरोधी पक्ष सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देऊ लागतात ...)

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपण सर्वांनी शांत बसावे. या ठिकाणी दोन्ही बाजूची मते मी ऐकली आहेत, समजून घेतली आहेत. या विषयावर चर्चा करण्याची सरकार पक्षाची देखील तयारी आहे. मात्र माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एका गोष्टीचा आग्रह केला आहे की, या महत्त्वाच्या चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उपमुख्यमंत्री हे देखील सभागृहामध्ये उपस्थित असावेत. म्हणूनच ही चर्चा त्यांच्या उपस्थितीत होण्यासाठीच ही चर्चा मी उद्या घेण्याचा निर्णय घेतो. त्याप्रमाणे उद्या ही चर्चा घेतली जाईल आणि ती नियम ९७ खाली असेल. ...

(विरोधी पक्ष सदस्य घोषणा देत 'वेल' मध्ये येतात ...)

यानंतर पुढील विषय घेण्यात येईल.

**

..... एम २ ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(अ) अन्वये सन २००७ चा अध्यादेश क्रमांक ६ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २००७ मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(अ) अन्वये सन २००७ चा अध्यादेश क्रमांक ७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २००७ मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

**

(विरोधी पक्ष सदस्य 'वेल' मध्ये घोषणा देत असतात ...)

..... एम ३ ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे</u>.

श्री. जयंत पाटील (वित्त व नियोजन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 1 एप्रिल 2006 ते 31 मार्च 2007 या कालावधीत शासनाच्या वेगवेगळ्या विभागांतर्गत संस्था, उपक्रमांनी घेतलेल्या कर्ज व त्यावरील व्याजास तसेच उभारलेल्या कर्जरोख्यांस देण्यात आलेल्या हमी विषयीचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबतचे आश्वासनांचे विवरणपत्र छापावे)

***

..... एम 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 च्या दुसऱ्या अधिवेशनात विधान परिषद सभागृहात दिनांक 16 जुलै, 2007 ते दिनांक 2 ऑगस्ट 2007 या कालावधीत माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 520 आश्वासनांची यादी, तसेच सन 1988 चे पहिले अधिवेशन ते सन 2007 चे पहिले अधिवेशन या कालावधीत शासनातर्फे सभागृहात देण्यात आलेल्या विविध मंत्रालयीन विभागांच्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या माहितीची एकूण 533 विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : सन 2007 च्या दुसऱ्या अधिवेशनात विधान परिषद सभागृहात दिनांक 16 जुलै 2007 ते दिनांक 2 ऑगस्ट 2007 या कालावधीत माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 520 आश्वासनांची यादी तसेच सन 1988 चे पहिले अधिवेशन ते सन 2007 चे पहिले अधिवेशन या कालावधीत शासनातर्फे सभागृहात देण्यात आलेल्या विविध मंत्रालयीन विभागांच्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या माहितीची एकूण 533 विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : कृपया सोबतची आश्वासनांची यादी छापावी .)

**

(विरोधी पक्ष सदस्य 'वेल' मध्ये घोषणा देत असतात ...)

..... एम 5 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सन 2007-08 करिता खर्चाचे पूरक विवरण पत्र सादर करणे</u>.

श्री. जयंत पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007-08 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदींना अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2007-08 या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहास शिफारस केली आहे.

सभापती : सन 2007-08 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले अहे. सदरहू खर्चाच्या पूरक विवरणपत्राच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपाल खणांमध्ये ठेवण्यात येत आहेत.

**

(या नंतर श्री. सरफरे ..... एन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.व मु. शी. : विधेय□□ संमती व अधिसंमती

सभापती : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती/राज्यपालांनी अधिसंमती मिळाल्यासंबंधी यादी प्रधान सचिव वाचून दाखवतील.

विशेष कार्य अधिकारी : (अ) खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली :-

सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 40 - फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2007.

(ब) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली.

(1) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 35 - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2007.

(2) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 36 - मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, 2007

(3) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 38 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, 2007.

(4) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 38 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, 2007

(5) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 39 - महाराष्ट्र (व्दितीय पुरवणी) विधेयक, 2007.

(6) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 42 - महाराष्ट्र (व्दितीय पुरवणी) विधेयक, 2007

(7) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 43 - महाराष्ट्र कर विषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, 2007.

(8) सन 2007 चे वि.प.वि. क्रमांक 3 - महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (तात्पुरती सुधारणा) विधेयक, 2007.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पु.शी.
मु.शी. : **सभापती तालिका नामनिर्देशित करतो**

सभापती : मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम 8 (1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो.--

(1) श्री. उल्हास पवार

(2) श्रीमती उषाताई दराडे

(3) श्री. जगदीश गुप्ता

(4) श्री. अरविंद सावंत

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

सभापती : सभागृहाच्या कार्यक्रम पत्रिकेतील उर्वरित कामकाज उद्या किंवा नंतरच्या दिवशी घेण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 21 नोव्हेंबर 2007 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 1 वाजून 51 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 20.11.2007 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

****

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही